# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

कार्यासन 30.

इतिवृत्तांतः—

विषय— महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समितीची बैठक सोमवार, दिनांक 16.07.2012 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. कामगार मंत्री कार्यालय, मंत्रालयीन दालनात झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

| अ.क्र | मा.सदस्यांची नांवे | : | पदनाम |
|---|---|---|---|
| 1 | श्री. हसन मुश्रीफ साहेब, कामगार मंत्री | : | अध्यक्ष |
| 2 | श्री. राजेंद्र गावीत साहेब,<br>मा. कामगार राज्यमंत्री | | निमंत्रक |
| 3 | श्री. नितीन गद्रे,<br>मा.सचिव (कामगार) मंत्रालय, मुंबई | : | निमंत्रक |
| 4 | श्री मधुकर गायकवाड,<br>मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई | : | पदसिध्द सदस्य |
| 5 | मा. अनिल शिवाजीराव भोसले,<br>विधानपरिषद सदस्य, | : | सदस्य |
| 6 | श्रीमती के.अे. श्रीबाद<br>श्री. पी. कर्माशे,<br>श्रम प्रर्वतन अधिकारी (केंद्रीय) | : | सदस्य |
| 7 | श्री. मोरे,<br>संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई | : | सदस्य |
| 8 | मा. बंडू गोपाळ मांगले, मालक प्रतिनिधी | : | सदस्य |
| 9 | मा. मुस्ताक अब्दुल्ला दळवी, मालक प्रतिनिधी | : | सदस्य |
| 10 | डॉ. गजानन देसाई, कामगार प्रतिनिधी | : | सदस्य |
| 11 | मा. नरेंद्र पाटील, कामगार प्रतिनिधी | : | सदस्य |
| 12 | मा.आसिफ उमर कासकर,<br>वास्तुशास्त्र संघाचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| 13 | श्री.आर व्ही कुलकर्णी,<br>कामगार उप आयुक्त, मुंबई | : | सचिव |
| 14 | श्री. एस एम कदम,<br>सहायक कामगार आयुक्त, मुंबई | : | सहायक कामगार आयुक्त |

इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समितीच्या
दिनांक 16 जुलै 2012 रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

1. इमारत व इतर बांधकाम सल्लागार मंडळाच्या प्रथम बैठकीच्या सुरूवातीस मा. अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरूवात केली. प्रथमतः सदस्यांचा परिचय करून देण्यात आला.
2. सदर अधिनियमांची व मंडळाची मा. अध्यक्षांनी माहिती दिली. सदरील इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्तीचे नियमन), अधिनियम, 1996 केंद्र शासनाने पारीत केलेला असून, त्यानुसार मंडळ स्थापीत करण्यात आलेले आहे. इमारत बांधकाम मालकाकडून प्रकल्प किंमतीच्या 1 टक्का दरानेचा उपकर सेस अधिनियमानुसार जमा केला जातो. व त्याचा उपयोग बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी होतो. यासाठी वर्षाच्या कालावधीत 90 दिवस काम केलेल्या कामगारास मंडळात नोंदणी करणे आवश्यक आहे. आजपावेतो सुमारे 52000 कामगारांची नोंदणी झालेली आहे व कोटकोरपणे उपकर गोळा करणे पूर्ण झालेले नाही. बांधकाम कामगाराच्या व्याख्येत नाका कामगार व विटभट्टी कामगार येत नाहीत. म्हणून त्यांचेसाठी विचारविनिमय होण्याची आवश्यकता आहे. विधानसभा, विधानपरिषदमध्ये सातत्याने प्रश्न विचारले जात आहेत.
3. मा.अध्यक्षांच्या सुचनेनुसार मंडळाचे अध्यक्ष व कामगार आयुक्त यांनी मंडळाच्या कामकाजाची माहिती दिली. मंडळ स्थापन होवून 1 वर्ष पूर्ण झालेले असून, या कालावधीत सुमारे 52000 कामगारांची नोंदणी झालेली आहे. मंडळासाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध झालेला नाही. त्याचे प्रस्ताव केलेले आहेत. तसेच मंडळाच्या 11 बैठका झालेल्या असून, त्यात 13 योजनांना मंजूरी दिलेली आहे. यातील प्रमुख म्हणजे अंत्यविधी सहाय रू 5000, कामगारास अंपगत्व आल्यास रू 1 लाख अनुदान, शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती रू 10000 आणि नैसर्गिक प्रसूतीसाठी रू 5000, 1ली ते 10वी पर्यंत विद्यार्थींनी पाल्यास रू 50 प्रतिमाह, 10 वी व 12 वी साठी रू 5000 प्रोत्साहन व वैद्यकीय व तांत्रिक शिक्षणासाठी रू 35 हजार सहाय, तसेच रू 5000 विशेष सहाय दरवर्षी 12वी ते पदवी शिक्षणासाठी रू 2000 दरवर्षी, कौशल्यवाढीच्या प्रशिक्षण कालावधीचे वेळी 100 टक्के किमान वेतन दराने भत्ता, रू 25 हजार मुली पाल्यांसाठी मुदतबंद ठेव, गंभीर आजारासाठी रू 10 हजार, कामगाराचे निधन झाल्यास पती/पत्नीस 5 वर्षापर्यंत रू 1000.

इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समितीच्या
दिनांक 16 जुलै 2012 रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

कामगारांची कौशलय वृध्दी व पाल्यांचे कौशल्य यासाठी व्यवसाय शिक्षण विभागाबरोबर चर्चा चालू आहे. बिडी कामगार घरकुल योजनेच्या धर्तीवर या कामगारांसाठीची घरकुल योजन बनविणे आवश्यक आहे. उपकर वसूलीसाठी प्रयत्न येत असून यासाठी विविध पातळीवर बैठका घेतल्या गेल्या आहेत. तसेच पत्र व अर्ध शासकीय पत्राद्वारे संबंधीतांना स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. परिणामी सेस वसुली वाढत आहे.

4. **बांधकाम कामगारांना जनश्री विमा व अन्य योजनांचा लाभ देणे.**

शासनाच्या जनश्री विमा योजना, राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना, स्वावलंबन योजना याबाबत समग्र चर्चा झाली. या योजना लागू करण्याबाबतचे दिनांक 29 जून 2012 चे केंद्रीय कामगार सचिवांचे पत्र आहे. वरील योजना यापूर्वीच कामगार क्षेत्रात लागू आहेत. या बांधकाम कामगारांना लागू करणे आवश्यक आहे. यावर मा. अध्यक्षांनी या योजना त्वरीत बांधकाम कामगारांना लागू केल्या जाव्यात असे सांगितले, ज्यास सर्व सदस्यांनी संमती दर्शविली. या योजना त्वरीत बांधकाम कामगारांना लागू करण्याचे ठरले.

5. **मंडळाच्या व अधिनियमाच्या कामकाजासाठी अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करणेबाबत.**

सद्यस्थितीत मंडळाकडे एकही कर्मचारी नियुक्त केला गेला नाही. तसेच अधिनियमाचे कामकाज करण्यासाठीही एकही कर्मचारी नियुक्त केलेला नाही. त्यामुळे हे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचा–यांना अतिरिक्त कार्यभार देवून केले जात आहे. कामास गती येण्यासाठी मंडळाचा जिल्हा पातळीपर्यंत स्वताचा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे. तसेच अधिनियमांतर्गतचा कर्मचारी वर्ग व मंडळाचा कर्मचारी वर्ग यासाठीचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. मा. नरेंद्र पाटील यांनी कर्मचा–याशिवाय काम होवू शकणार नाही व सध्याच्या कर्मचा–यावर कामाचा बोजा वाढत आहे, याबाबत सांगितले. याबाबत समग्र चर्चा होवून मंडळाने आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमावा व अधिनियमासाठीचा कर्मचारी वर्ग शासनाने त्वरीत उपलब्ध करून दयावा असे ठरले.

6. **बांधकाम कामगारांची व पाल्यांची कौशल्य व कौशल्यवृध्धी.**

मा. कामगार आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार या क्षेत्रातील कामगारांची प्रगती होण्यासाठी या योजना आवश्यक आहेत, असे प्रतिपादले. त्यावर मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, बांधकाम कामगाराच्या मुलाने प्रगती केली पाहिजे व अन्य बांधकाम क्षेत्रा व्यतिरिक्त कौशल्यही आत्मसात केले पाहिजे. त्यासाठी आयटीआय मध्ये कोर्स करणे गरजेचे आहे. व यशदा सारख्या संस्थांची मदत घेणेही आवश्यक आहे. यावर मा. कामगार आयुक्तांनी कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी कौशल्य योजनांची बाब व्यवसाय प्रशिक्षण शासनाच्या व्यवसाय शिक्षण विभागाबरोबर चर्चिली असून, या विभागाकडून प्रस्ताव अपेक्षित आहे व त्यावर तावडतोब कार्यवाही केली जाईल. मा.सदस्य श्री. मांगले यांनी कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळण्याची आवश्यकता सांगितली. मा. कामगार आयुक्त यांनी कौशल्य व कौशल्यवृध्दी प्रशिक्षण कालावधीत किमान वेतन दराने प्रोत्साहन भत्ता देण्याचे सांगितले. याबाबत विचारविनिमय होवून बांधकाम कामगार व पाल्यांसाठी कौशल्य व कौशल्यवृध्दीच्या योजना शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचा खर्च देवून तातडीने राबविण्यात याव्यात, असे ठरले.

7. **बिडी कामगारांच्या घरकुल योजनेच्या धर्तीवर बांधकाम कामगारासांठी घरकुल योजना राबविणेबाबत.**

याबाबत समग्र चर्चा झाली. सदस्यांनी घरासाठी कामगारांना कर्ज रूपाने पैसे देण्याचे सांगितले त्यावर मा. अध्यक्षांनी हे कामगार घरबांधणी करीता दिलेल्या कर्जाची परतफेड कसे करू शकतील. हा प्रश्न उपस्थित केला. केंद्र शासनाची बिडी कामगारांसाठीची घरकुल योजना आहे. यासाठी कामगारांस अनुदान दिले जाते व त्याचा भुखंड असणे आवश्यक आहे. मा. सदस्य, श्री. मांगले यांनी सूचविले की, सोलापूर जिल्हयामध्ये बिडी कामगारांसाठी घरकुल योजना राबविली आहे. त्यानुसार या कामगारासाठीही योजना राबविली जावी. याबाबत चर्चेअंती अशी योजना तयार करून पुढील बैठकीत चर्चा करून राबविण्याचे ठरले.

8. **बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी शाळा, वसतिगृहे उभारणे व चालविणे.**

वरील विषयाबाबत चर्चा झाली. अशाप्रकारचा मंडळाचा ठराव असून, तो शासनाकडे पाठविला असल्याचे सांगितले. यावर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी प्रतिपादले की, मुलांना 6 ते 14 वर्षापर्यंत शिकविले गेले पाहिजे. अशाप्रकारच्या शाळा व वसतिगृहे समाज कल्याण विभागाच्या आहेत. या मुलांना या शाळेमध्ये व वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळणे इत्यादी सवलती लागू आहेत. म्हणून नव्याने बांधकाम मंडळाने अशा प्रकारे शाळा व वसतिगृहे बांधणे, चालविणे याची गरज नाही. त्यामुळे मंडळाने हे काम करण्याची आवश्यकता नाही. असे सर्वानुमते ठरले. मंडळात नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना जास्तीत जास्त व्यक्तीगत स्वरूपाचे लाभ देण्याचे ठरले.

9. **मंडळासाठी वाहन, कॉम्प्युटर, प्रिंटर्स इत्यादी साहित्य तसेच भत्ते इत्यादीच्या प्राथमिक खर्च भागविण्यासाठी मंडळास रू 50 लाख उपलब्ध करून देणे.**

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन होवून 1 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. मंडळाचे कामकाज कामगार आयुक्तांच्या कर्मचा–यांकडून अतिरिक्त कार्यभाराने करून घेतले जात आहे. मंडळास लेखन साहित्य, कॉम्प्युटर प्रिंटर्स, टपाल, भत्ते इत्यादीसाठी खर्च होतो. त्यासाठी रू 50 लाख उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यातून मंडळाचा कार्यालयीन खर्च भागविण्यात यावा, असे ठरले.

10. **बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास रू 2 लाख अर्थ सहाय देणे.**

बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याचे कुटुंब उघडयावर पडू नये म्हणून मंडळाने काळजी घेतली पाहिजे, असे अध्यक्षांनी मनोगत व्यक्त केले. म्हणून त्यास कामगाराच्या पती/पत्नीस/वारसास रू 2 लाख अर्थ सहाय तातडीने दिले गेले पाहिजे. त्यामुळे जनमाणसात मंडळाची प्रतिमा उजळ होईल. याबाबत चर्चा झाली व अपघाती मृत्यू झालेल्या नोंदीत कामगाराच्या पती/पत्नी यास किंवा वारसास तातडीने रू 2 लाखाची मदत केली जाण्याचे एकमताने ठरले.

11. **बांधकाम कामगार मंडळाच्या कार्यालयासाठी जागा भाडेतत्वावर घेणे तसेच मालकीची जागा उपलब्ध करणे.**

मंडळाचे कार्यालये सध्या कामगार आयुक्त कार्यालयाच्या एका खोलीत चालू आहे. मंडळाचा कारभार संपूर्ण महाराष्ट्र पातळीवरचा आहे. म्हणून कामगार आयुक्त यांचेकडे भाडेतत्वावर असलेली वरळी, मुंबई येथील जागा तातडीने मंडळास देण्यात यावी यासाठी आवश्यक तो भाडे, फर्निचर इत्यादीवर जो काही खर्च करावा लागणार आहे तो करण्यात यावा व सुसज्ज कार्यालय करण्यात यावे. असे मा. अध्यक्षांनी सांगितले व ते एकमताने ठरले. मा. अध्यक्षांनी या कार्यालयास मी स्वतः भेट देईल असे आश्वासन दिले.

12. **बांधकाम कामगारांसाठीचे नोंदणी अभियान राबविणे.**

महाराष्ट्र राज्यात बांधकाम कामगारांची अंदाजित संख्या पाहता, सध्या मंडळाकडे केवळ 52 हजार कामगारांची नोंदणी झालेली आहे. संपूर्ण कामगारांची नोंदणी होण्याची बाबीवर मा. अध्यक्षांनी जोर दिला. यासाठी असे अभियान राबविण्याची गरज असल्याचे सांगितले. मंडळाची व मंडळाच्या योजनांची माहिती कामगारापर्यंत पोहचविण्याची जाहिराती दिल्या गेल्या पाहिजेत. यावर मा. कामगार आयुक्तांनी पुणे येथे बाल कामगार बैठकीच्या वेळी यशदाच्या अधिका–यांबरोबर चर्चा केल्याचे सांगून यशदाने दिलेला प्रस्ताव सुमारे रू 4 कोटीचा आहे व तो महाग आहे. यावर नोंदणी अभियान चालू करण्याची आवश्यकता प्रतिपादली गेली. यासाठी जाहिरात व कॅम्प इत्यादीसाठीचा खर्च करण्यात यावा, असे ठरले. मा. सदस्यांना नोंदणी अर्ज नमूना देण्यात यावा, असे अध्यक्षांनी सूचविले.

13. **मंडळामध्ये कामगारांची नोंदणी, योजना राबविणे इत्यादीसाठी मंडळाच्या सदस्यांची उप समितीची आवश्यकता नाही व अशी तरतूद नाही. उप समिती गठीत केली जावू नये, असे ठरले.**

14. मा. अध्यक्षांनी प्रतिपादले की, मंडळामध्ये दैनंदिन वेगवेगळया ठिकाणी काम करणारे नाका कामगार तसेच दगड फोडणारे कामगार, रंग कामगार, विटभट्टी कामगार कामगाराच्या व्याख्येत येणे आवश्यक आहे. यासाठीची वर्षात 90 दिवस काम केल्याचे मालकाच्या प्रमाणपत्राची अट शिथिल होणे गरजेचे आहे व या कामगारांची नोंदणी व्हावी यासाठी नियमात बदल करणेही आवश्यक आहे. सर्व सदस्यांनी यास सहमती दर्शविली. त्याचप्रमाणे मंडळाकडे आजमितीस सुमारे रू 711 कोटी इतकी रक्कम

जमा असून, ही रक्कम अधिक व्याज मिळण्याच्या दृष्टीकोनातून गुंतविण्याबाबत विचारविनिमय झाला. एक वर्षाच्या कालावधीसाठी योग्य त्या रक्कमेची गुंतवणूक केवळ राष्ट्रीयकृत बॅकेतच केला जावी व त्यासाठी मुंबई व शक्यतो अन्य मोठया शहराच्या बॅकेच्या व्याज दराबाबत माहिती घ्यावी व त्यानुसार केवळ राष्ट्रीयकृत बॅकेतच गुंतवणूक केली जावी, असे एकमताने ठरले.

15. मा. अध्यक्षांनी बैठकीत उपस्थित असलेल्या मा. सदस्यांना उपस्थिती भत्ता तावडतोब चालू करण्याविषयी सांगितले.

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.